**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : ग्रापापु-२०१९/प्र.क्र.२२/पापु-०७,**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, सातवा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १९ जुलै, २०१९

**परिपत्रक:-**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या वर्षाच्या कृती आराखड्याबाबत दिनांक ०७/०२/२०१९ रोजी मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या समवेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध टप्प्यांवर प्रलंबित असणाऱ्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांबाबत चर्चा करण्यात आली. प्रशासकीय अडचणींमुळे काही योजनांचे बहुतांश काम पूर्ण होऊनही योजना अंतिम होत नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत वार्षिक कृती आराखडा व तद्नुषंगिक कामे करतांना अडचणी निर्माण होतात. तसेच सदर कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्धता व वितरण यामध्येही समस्या उद्भवत आहेत. या सर्व बाबींसंदर्भात विचारविनिमयाअंती खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत राबविलेल्या पाणी पुरवठा योजना दीर्घ कालावधी होऊनही रखडलेल्या आहेत व अशा योजनांशी संबंधित तत्कालीन अभियंता बदली/सेवानिवृत्ती इ. कारणास्तव त्या ठिकाणी कार्यरत नसल्याने मुल्यांकन करण्यास अडचणी येत आहेत, अशा योजनांबाबत कार्यरत उप अभियंता यांनी पंचनामा करुन मुल्यांकन पूर्ण करावे. उप अभियंता यांनी अशाप्रकारे पंचनामा करण्यापूर्वी संबंधितांना कळविणे आवश्यक राहील. पंचनामा करताना गावातील किमान दोन व्यक्ती घेण्यात याव्यात व कार्यकारी अभियंता यांच्याकडून मुल्यांकनाची तपासणी करून त्यास मान्यता घेण्यात यावी. संबंधित प्रकरणी

गुन्हे दाखल करण्यात आले असल्यास अथवा/मा. न्यायालयात दोषारोपपत्रे दाखल करण्यात आली असल्यास मुल्यांकनाचा अहवाल संबंधित पोलिस स्टेशन/मा. न्यायालयास सादर करावा.

२. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडील अभिलेखानुसारही बँक खात्यांची प्राथमिक माहिती उपलब्ध होऊ शकेल. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या संबंधित बँक खात्याचा तपशिल प्राप्त करण्यासाठी अग्रणी बँकेमार्फत संबंधित बँकाकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पाठपुरावा करावा.

३. ग्रामीण पाणी पुरवठा समित्यामार्फत राबविण्यात आलेल्या व रखडलेल्या योजनांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पंचायत समिती स्तरावर विशेष शिबीरांचे आयोजन करावे. या शिबीरात संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समितीचे अध्यक्ष, ग्रामसेवक, गट विकास अधिकारी व संबंधित अभियंते यांनी लेखे अंतिम करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे प्राप्त करावीत. या शिबीरांच्या समन्वयाची व संबंधित अभिलेख उपलब्ध करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहील.

४. मुद्दा क्रमांक २ व ३ नुसार कार्यवाही करूनही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व ग्रामपंचायत अंतिम देयकाबाबतची कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करीत असल्यास वितरीत निधी व झालेल्या कामाचे मुल्यांकन कार्यकारी अभियंता यांनी करुन योजना जिल्हा परिषदेमार्फत परस्पर अंतिम करावी.

५. पाणी पुरवठा योजनांच्या बँक खात्याचा तपशिल उपलब्ध होत नसल्याने सनदी लेखापाल यांना लेखापरीक्षण करण्यात अडचणी येत आहेत, अशा योजनांबाबत वितरीत निधी व योजनेच्या कामांचे मुल्यांकन याचा ताळमेळ घेऊन सनदी लेखापालांकडून लेखापरीक्षण करण्यात यावे.

६. मुल्यांकन किंमत व खर्च केलेली एकूण रक्कम यामध्ये जर तफावत येत असेल तर, समिती सदस्यांना त्याबाबत नोटिस देण्यात यावी व फरकाची रक्कम भरली नाही तर प्रथम RRC ची कार्यवाही करावी व नंतर FIR दाखल करावा. त्याचप्रमाणे समिती सदस्यांना नोटिस देऊन सदरील परिस्थीतीबाबत स्पष्टीकरण मागवावे.

७. योजनेची शिल्लक कामासाठी निविदा काढून अंमलबजावणी करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांबाबत जिल्हा परिषद लेखा संहितेच्या प्रचलित पध्दतीनुसार योजना पूर्ण कराव्यात व कर कपाती करण्यात याव्यात.

८. वरीलप्रमाणे कार्यवाही करुनही ग्राम पंचायत योजना हस्तांतरीत करुन घेण्यास टाळाटाळ करीत असल्यास, संबंधित ग्राम पंचायतीस अंतिम स्मरणपत्र देऊन योजना पुर्णत्वाच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षण अहवालास एकतर्फी योजना हस्तांतरीत करुन, योजना अंतिम करावी. अशा रितीने योजना एकतर्फी हस्तांतरीत करण्यापूर्वी योजनेचे काम प्रकल्प अहवालानुसार समाधानकारक झाल्याची कार्यकारी अभियंता यांनी खातरजमा करावी.

९. पाणी पुरवठा योजनांचा अभिलेख जतन करण्याबाबत ग्रामसेवक व गट विकास अधिकारी यांना आवश्यकतेप्रमाणे प्रशिक्षण कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी द्यावे. पाणी पुरवठा योजनांबाबतचे अभिलेख संबंधित ग्रामसेवक यांनी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांना उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. अभिलेख उपलब्ध करून न देणाऱ्या ग्रामसेवकाविरुध्द यथोचित कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०७१९१४३०४३३९२८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VASANT
BHIMRAO MANE

Digitally signed by VASANT BHIMRAO MANE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VASANT BHIMRAO MANE
Date: 2019.07.19 14:35:10 +05'30'

**( वसंत माने )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:**

१. मा. मंत्री/राज्यमंत्री (सर्व), मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१.
४. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पी.एम.टी. बिल्डींग स्वारगेट, पुणे.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
८. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
९. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
१०.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
११.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१२.उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती (पापु-०७).